REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २ ऑगस्ट, १९४४ अंक ३१

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना : १९१९ )

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळा उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

## विविध माहिती

### नव्या इंजनांची व यंत्रसामुग्रीची खरेदी

हिंदी रेल्वेजसाठी १९४५-४६ सालाकरितां ६० कोटि रुपयांची इंजनें व २ कोटि रुपयांची यंत्रसामुग्री ह्यास रेल्वेजच्या स्टॅन्डिंग फिनॅन्स कमिटीनें मान्यता दिली आहे. स्थानिक खरेदी अशक्य झाली तर ग्रेट ब्रिटनमध्यें ऑर्डरी देण्यांत येतील. आयातीचे बाबतींत सर्व देशांत ग्रेट ब्रिटनला प्राधान्य देण्यांत येईल.

### चालत्या आगगाड्यांत कोर्टे चालणार

बिगर तिकिट प्रवास करणाऱ्या व इतर रेल्वेबाबत गुन्हे करणारांची तात्काळ चोकशी करतां यावी, ह्यासाठी संयुक्त प्रांतांत चालत्या गाड्यांतून कोर्टें काम करणार आहेत.

### रेल्वे इंजनांस लागणारा कोळसा

युद्धास प्रारंभ झाल्यापासून उतारूंच्या वहातुकींत २९% व मालाच्या वहातुकींत २७% वाढ झाली असली, तरी १९४२-४३ मध्यें हिंदी रेल्वेजना फक्त १३% ज्यास्त कोळसा लागला. रेल्वेस लागणाऱ्या कोळशापैकीं ९०% कोळसा इंजनांत जाळण्यांत येतो, ह्या दृष्टीनें इंजनांचा कोळसा खाण्यावर विशेष नजर ठेवून जादा कोळसा खाणाऱ्या इंजनांबाबत त्याच्या कारणांची काळजीपूर्वक चोकशी करण्यांत येते. इंजनें नादुरुस्त स्थितींत असलीं, म्हणजे त्यांचें कोळसा खाण्याचें प्रमाण वाढतें.

### आगगाडीच्या डब्यांतील गर्दीमुळें झालेला भयंकर घोटाळा

आगगाडीच्या डब्यांतील गर्दीमुळें उपस्थित झालेल्या एका प्रसंगाचें वर्णन मुंबईच्या एका साप्ताहिकांत आलें आहे, तें गमतीदार आहे. त्याचीं दोन वऱ्हाडीं एकाच डब्यांत शिरलीं. तो डबा अर्थातच खच्चून भरलेला होता. दोन्हीं वऱ्हाडीं एकाच स्टेशनावर उतरून सामान पाहूं लागलीं. एका वऱ्हाडांत ३० डाग व एक बुरखा घातलेली वधू होती व दुसऱ्या वऱ्हाडांत ३९ डाग व एक बुरखाधारी वधू होती. आपलें सामान घेऊन दोन्हीं वऱ्हाडीं आपापल्या मार्गास लागलीं. वाटेंत त्यांपैकीं एकांतील वरास त्याच्या पत्नीचें दर्शन झालें, तेव्हां बुरख्यांतील स्त्री ही त्याची पत्नी नसल्याचें त्यास आढळून आलें. त्याची खरी पत्नी दुसऱ्या वऱ्हाडांत चुकून सामील होऊन भलत्याच पुरुषाची पत्नी बनली होती! धांवत जाऊन त्यानें आपली खरी पत्नी मिळवली!

### सरकार बंगाल-नागपूर रेल्वे विकत घेणार

बंगाल नागपूर रेल्वे कंपनीच्या खरेदीचें काम हिंदुस्थान सरकार ३० सप्टेंबर, १९४४ अखेर पुरें करील. त्या कंपनीस एकूण ४ कोटि, ८० लक्ष रुपये द्यावे लागतील. भाग भांडवलाच्या प्रत्येक १०० पौंडांवर २० पौंड वाढावा देण्याचें ठरलें आहे. बंगाल नागपूर रेल्वे कंपनीची स्थापना १८८७ सालीं झाली.

### अन्नपुरवठ्यास ब्रिटिश सरकारची मदत

ब्रिटिश सरकार ग्रेट ब्रिटनमधील अन्नपुरवठ्यासाठी किती प्रचंड खर्च करतें, हें खालील आकडे दर्शवितील.

| कोटि पौंड | |
|---|---|
| ६ | ब्रेड, आटा, ओटमील |
| १·३ | मांस |
| १·८ | बटाटे |
| १·१ | अंडीं |
| १ | साखर |
| १ | दूध |

### रावळगांव शुगर फार्म लि.

वरील कंपनीस ३१ मार्च १९४४ अखेरच्या वर्षी ३,४९,५९३ रुपये निवळ नफा झाला. ऑर्डिनरी भागीदारास १४% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

### अमेरिकन सैनिक व अँग्लो इंडियन स्त्रिया

हिंदुस्थानांतील अमेरिकन सैनिकांस येथें विवाह करावयाचा असल्यास अगोदर त्याची परवानगी मागितली पाहिजे. परवानगीचे अर्ज सहानुभूतिपूर्वक विचारांत घेतले जाणार नाहींत, हें अमेरिकेच्या लष्करी खात्यानें स्पष्टपणें जाहीर केलें आहे. अमेरिकन लष्करांतील स्त्रिया व पुरुष ह्यांसहि अमेरिका देशाच्याबाहेर विवाह करण्यास सक्त मनाई आहे. अमेरिकन सैनिकांवरील ह्या निर्बंधाचा परिणाम अँग्लो-इंडियन स्त्रियांवर होणार आहे. जरूर वाटली तर विवाहाची परवानगी मिळेल ह्या अपेक्षेनें कित्येक अँग्लो-इंडियन स्त्रियांनीं अमेरिकन सैनिकांशीं मैत्री केली आहे. तेव्हां ह्यापुढें अमेरिकन सैनिकांस अँग्लो-इंडियन स्त्रियांबरोबर संबंध ठेवण्याची बंदी करण्यांत यावी, असें अँग्लो-इंडियन असोसिएशनचे अध्यक्ष, मि. अँथनी, ह्यांनीं सुचविलें आहे.

### लहान मुलांसाठी स्वस्त दुधाचा प्रचार

मुंबई शहरांतील दोन वर्षांखालील मुलांस स्वस्त दरानें दूध पुरविण्याच्या सरकारी योजनेचें अपेक्षित स्वागत झालें नाहीं, ह्या योजनेचा फायदा समजावून सांगण्यासाठी शहरभर प्रचार करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### मुंबई-न्यूयॉर्क बिनतारी वहातूक

सध्या हिंदुस्थानांतून अमेरिकेशीं बिनतारी संदेश पाठवावयाचे असले, तर ते लंडनद्वारा पाठवावे लागत असत. मुंबई ते थेट न्यूयॉर्क दळणवळणास १५ ऑगस्ट रोजीं सर गुरुनाथ बेवूर हे वॉशिंग्टन येथून प्रारंभ करतील. इंडियन रेडिओ अँड केबल कम्युनिकेशन्स कं. लि. ही कंपनी दोन अमेरिकन कंपन्यांचे सहकार्यानें ही नवी वहातूक योजना चालू ठेवणार आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | २४२ |
| २ जागतिक बाजार पेठांबाबत चुरस | २४३ |
| ३ हिंदी शेती सुधारणा व ब्रिटिश व्यापार | २४४ |
| ४ पूना मर्चंट्स को. बँक लि. | २४४ |
| ५ स्फुट विचार — रिझर्व्ह बँकेच्या मार्गाची वाटणी—शेडयूल्ड बँकांची तपासणी—त्यांच्या ठेवी व कर्जे—सहकारविषयक प्रश्नांची चर्चा | २४५ |
| ६ शेअर बाजार | २४६ |
| ७ ब्रिटिश विमा व्यवसायाची राष्ट्रीय कामगिरी | २४७ |
| ८ जर्मनीमधील चित्रपटांचा धंदा | २४७ |



# अर्थ

बुधवार, ता. २ ऑगस्ट, १९४४


## जागतिक बाजारपेठांबाबत चुरस

अमेरिकेंत नुकत्याच भरलेल्या चलन परिषदेचा मुख्य हेतु युद्धोत्तर काळांत जागतिक व्यापाराच्या मार्गांत अडचणी येऊं नयेत आणि त्यांत उद्भवणाऱ्या देवघेवींचा व्यवहार सुरक्षित चालवतां यावा हा आहे. सोनें आणि आंतरराष्ट्रीय हुंड्या ह्यांचा संग्रह जागतिक गंगाजळी निर्माण व्हावयाची आहे तीमध्यें केला जाईल आणि त्यामधून देशांच्या परस्पर व्यापारासाठी लागणाऱ्या विनिमय साधनांचा पुरवठा करण्यांत येईल. त्याचप्रमाणें जागतिक बँक स्थापन व्हावयाची आहे तिच्याकडून गरजू देशांस आर्थिक पुनर्घटनेसाठी कर्जें मिळतील. युद्ध संपल्यानंतर जगाची आर्थिक घडी पुन्हां नीट बसण्यास ह्या योजना आवश्यक व साहाय्यक आहेत, ह्यांत संशय नाहीं आणि त्यांस प्रमुख राष्ट्रांचा पाठिंबा असल्यानें त्या यशस्वी होण्यास अडचण पडूं नये. तथापि युद्धानंतर देशांच्या राहणीचा गाडा पूर्ववत् चालण्यास आंतरराष्ट्रीय व्यापाराचा ओघ अनिर्बंध रीतीनें वहाल्यावांचून उद्योगधंद्यांस पुरेशी गिऱ्हाइकी मिळणार नाहीं व लोकांस आवश्यक तें काम व उत्पन्न पुरवलें जाणें अवघड आहे. आज लढाऊ उपयोगाचा माल काढण्यांत कारखाने, भांडवलवाले व कामकरी गुंतले आहेत. युद्धानंतर ह्यांस सध्यासारखें काम मिळावयाचें नाहीं आणि बेकारी मोठ्या प्रमाणावर पसरेल. देशांतील भांडवल, यंत्रसामुग्री व मनुष्यबळ ह्यांचा अधिकांत अधिक उपयोग होण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली पाहिजे आणि ती उत्पन्न होण्यास आंतरराष्ट्रीय विनिमय सुलभपणानें होणें आवश्यक आहे. इंग्लंडसारख्या देशांत कच्चा माल आणि अन्नसामुग्री बाहेरच्या देशांतून आयात करावी लागते आणि तिचा मोबदला पक्क्या मालाच्या निर्यातीच्या स्वरूपांत दिला जातो. म्हणजे इंग्लंडची अंतर्गत आर्थिक सुस्थिति पुष्कळशी निर्गत व्यापारावर अवलंबून आहे आणि त्याची भरभराट होईल त्या मानानें ब्रिटिश उद्योगधंदे चालतील आणि लोकांस काम व मजुरी देऊन त्यांचें जीवन सुखाचें करतील. ह्यामुळें निर्गत व्यापाराच्या संवर्धनास इंग्लंडमध्यें व अमेरिकेंत विशेष महत्त्व दिलें जात असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

ब्रिटिश व अमेरिका ह्या राष्ट्रांतील धंदेवाले जागतिक व्यापाराच्या विस्ताराच्या योजना आखीत आहेत, आणि त्या निर्बंध रीतीनें अंमलांत येण्याच्या मार्गांत संरक्षक जकाती, राष्ट्रीय सरकारांचीं नियंत्रणें व हुंडणावळीच्या अडचणी ह्यांचे कांटे पसरवण्यांत येऊं नयेत असा त्यांचा आग्रह आहे. प्रस्तुत युद्धापूर्वी जर्मनीसारख्या देशांनीं स्वयंपूर्ततेचें धोरण अंगिकारलें होतें आणि त्याचे योगानें जागतिक व्यापार आणि देवघेव हीं मर्यादित झालीं होतीं. युद्धानंतरच्या काळांत कांहीं राष्ट्रीय सरकारांनीं असला क्रम चालू केल्यास जगाची आर्थिक घटना स्थिर पायावर प्रस्थापित होणें कठिण होईल असें त्यांचें म्हणणें आहे. इंग्लंडमध्यें व्यापारी, कारखानदार व इतर पुढारी ह्यांनीं अलीकडे उद्गार काढले आहेत, त्यांत ह्या बाबतींतली भीति स्पष्टपणानें व्यक्त करण्यांत आली आहे. हिंदुस्थान सरकारचे माजी फडनवीस सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं लंडन टाइम्सला एक पत्र पाठवून त्यांत प्रस्तुत विषयावर कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत. त्यांचा आशय असा आहे कीं, इंग्लंडनें बाहेरच्या देशांत भांडवल गुंतवलें होतें, त्याचें वार्षिक उत्पन्न त्यांचेकडून प्रतिवर्षी कच्चा माल व अन्नसामुग्री ह्यांचे स्वरूपांत युद्धापूर्वी मिळत असे. आतां तें भांडवल परतफेडीमुळें संपलें आहे आणि त्यामुळें पूर्वींसारखी आवश्यक मालाची आयात होण्यास इंग्लंडचा निर्गत व्यापार पन्नास टक्क्यांनीं वाढला पाहिजे. ब्रिटिश माल अधिक प्रमाणांत परदेशांत खपेल तरच त्याच्या किंमतींत इंग्लंडला कच्चा माल व अन्न ह्यांची खरेदी बाहेरच्या देशांत करतां येईल. पण इतर देश स्वतःचे कारखाने वाढविण्याची खटपट करतील आणि त्यांतील बाजारपेठांत परदेशी मालाच्या खपास जरूर तो वाव मिळणार नाहीं. ह्या स्थितींत ब्रिटिश कारखानदारी व व्यापार ह्यांची घडी विचारपूर्वक आणि सर्वांच्या सहकार्यानें बसवण्यांत यावी असें सर जॉर्ज ह्यांचें म्हणणें आहे.

ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कानडा, दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान इत्यादि देशांत युद्धपरिस्थितींतल्या निकडीच्या मागणीमुळें कित्येक धंदे विस्तार पावले आहेत आणि कांहीं नवीन स्थापन झाले आहेत. ह्या धंद्यांचा माल युद्धापूर्वी सदरहु देशांत इंग्लंडमधून जात असे आणि सध्या त्यांमधील बाजारांत ब्रिटिश माल दिसून येत नाहीं. असल्या बाजारपेठांत हा माल पुन्हां खपूं लागून इंग्लंडचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांची घडी पूर्ववत् कशी बसणार असा येथें प्रश्न आहे. ब्रिटिश माल सुबक व स्वस्त असल्यानें तो बाहेरच्या देशांनीं स्वीकारावा आणि तो बनवणाऱ्या स्वतःच्या कारखान्यांचा व्याप हळुहळु मर्यादित करावा अशी इंग्लंडमधलि धंदेवाल्यांची सूचना आहे. ह्यांत इंग्लंडचें आणि इतर देशांचें हित आहे असें त्यांचें म्हणणें आहे. स्वस्त माल जेथें मिळेल तेथें घ्यावा आणि महाग असेल तेथें तो विकावा ह्या तत्त्वावर आधारलेल्या अनियंत्रित व्यापारी व्यवहारांत जगाचें कल्याण आहे असा ब्रिटिश धंदेवाल्यांचा युक्तिवाद आहे.

परंतु इंग्लंडप्रमाणें इतर देशांसहि युद्धोत्तर काळांत स्वतःची आर्थिक अभिवृद्धी घडवून आणावयाची असल्यानें त्यांस वरील विचारसरणी पटेल असें नाहीं. अमेरिकेचेंच उदाहरण घ्या. युद्धकाळांत अमेरिकन धंद्यांचा एवढा विस्तार झाला आहे कीं त्याची स्पर्धा जगाच्या बाजारांत ब्रिटिश मालास जाचक झाल्यावांचून राहणार नाहीं असें ब्रिटिश धंदेवाल्यांस वाटत आहे. समुद्रावरील

जहाजांची आणि आकाशांतील व्यापारी विमानांची वहातूक अमेरिकेच्या वर्चस्वासाठी जाईल आणि इंग्लंड त्या धंद्यांत मागें पडेल अशी त्यांस भीति आहे. युद्धापूर्वी इंग्लंडला व्यापारी विमा आणि जागतिक बँकिंगचे व्यवहार ह्यांचें कोट्यवधि रुपयांचें वार्षिक उत्पन्न मिळत असे. सातासमुद्रावरील वाहतुकीच्या धंद्यांत त्याचें प्राबल्य होतें. ही स्थिति पुन्हां अस्तित्वांत येईल का ? हा येथें प्रश्न आहे. इतर देश व इंग्लंड ह्यांच्या आर्थिक हितसंबंधांचा मेळ कसा घालतां येईल ह्याचा विचार ब्रिटिश धंदेवाल्यांनीं केला पाहिजे. हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीच्या योजनेंत कित्येक नवीन धंद्यांची स्थापना अंतर्भूत आहे. ब्रिटिश यंत्रसामुग्री जरूरीप्रमाणें आयात होण्याची तरतूद तीमध्यें आहे. परंतु स्वतःच्या गरजेप्रमाणें माल तयार करण्याचें आणि सोयीप्रमाणें वाटेल त्या देशांतून तो आयात करण्याचें स्वातंत्र्यहि त्या योजनेंत मूलभूत आहे. हिंदी स्टर्लिंग शिलकांच्या विनियोगाच्या प्रश्नास ह्याच दृष्टीनें विशेष महत्त्व आहे हें येथें लक्षांत ठेविलें पाहिजे. राष्ट्रीय मध्यवर्ती हिंदी मंत्रिमंडळाच्या स्थापनेचें अगत्यहि वरील विवेचनानें स्पष्ट होण्यासारखें आहे.

## हिंदी शेतीसुधारणा व ब्रिटिश व्यापार

ग्रेट ब्रिटनचा हिंदुस्थानाशीं व्यापार व त्याचें भवितव्य ह्या विषयावर सर आल्फ्रेड वॅटसन ह्यांनीं रॉयल एंपायर सोसायटींत भाषण केलें, तें हिंदुस्थानांतील जनतेस उद्बोधक होण्याजोगें आहे. " आपल्याला किफायतशीर व मोठी बाजारपेठ पाहिजे असेल, तर जेथें लोकवस्ती मोठी आहे, व ज्या लोकवस्तीचें रहाणीचें मान वाढण्यास पुष्कळ वाव असला तरी स्थानिक उत्पादन पुरें पडत नाहीं, अशीं ठिकाणेंच आपण शोधलीं पाहिजेत " असें त्यांनीं श्रोत्यांना सांगितलें. हिंदुस्थान व चीन हे देश ह्या दृष्टीनें एकदम नजरेसमोर येतात, परंतु जेथें लोकांना अर्धपोटीं रहावें लागतें, तेथें मालाचा उठाव होण्यास वाव कसा मिळणार ? हिंदुस्थानांतील उद्योगधंदे वाढले असले व युद्धपरिस्थितीमुळें त्यांस जोराची चालना मिळाली असली, तरी बहुसंख्य हिंदी जनतेचें जीवन शेतीवरच अवलंबून आहे व त्या जनतेचें रहाणीचें मान वाढल्याविना माल विकत घेण्याची शक्ति त्यांचेमध्यें निर्माण होणार नाहीं हें उघड आहे " हिंदुस्थानांतीलच नव्हे तर सबंद जगांतील शेतकऱ्यांस त्यांच्या मालाचे चांगले पैसे मिळावे, हें जगाच्या हिताच्या दृष्टीनेंहि आवश्यक आहे " असें सांगून " हिंदुस्थानांतील ४० कोटि लोकांची आर्थिक स्थिति सुधारणें ही गोष्ट केवळ भूतदयेच्या दृष्टीनेंच नव्हे तर व्यापारी दृष्टीनेंहि हिताची आहे " असें ते स्पष्ट म्हणाले. शेतीच्या मालाची किंमत वाढली म्हणजे कारखान्यांतील कामगारांचीहि मजुरी वाढेल. त्यांची क्रयशक्ति सुधारली म्हणजे बाजारपेठेवरहि त्याचा चांगला परिणाम होईल. पूर्वेकडील देशांतील कामगारांच्या अल्प वेतनामुळें पाश्चिमात्य देशांतील मजुरांचें वेतन कमी होईल, किंवा त्यांचेवर बेकारीची पाळी येईल ही भीतिहि हिंदी कामगारांचें वेतन वाढल्यामुळें, कमी होण्यास मदत होईल, हा सर वॅटसन ह्यांचा मुलाहिजा मार्मिक आहे. " हिंदी बाजारपेठेंत अमेरिकेस स्थान दिलें जाणार नाहीं, अशी त्या देशानें भीति बाळगण्याचें कारण नाहीं; हिंदुस्थानावर आमची पक्की सत्ता होती त्यावेळींहि आम्ही अमेरिकेस मज्जाव केला नव्हता; हिंदुस्थानची आम्हीं लूट चालविली आहे, हा म्हणण्यास चालू शतकांत तरी आधार सांपडणार नाहीं; हिंदुस्थानाच्या उद्धाराकरितां ब्रिटिश औद्योगिक हितसंबंधांनीं एवढा स्वार्थत्याग केला आहे, कीं त्यास वसाहतींच्या इतिहासांत दाखला मिळणें शक्य नाहीं." वगैरे गोष्टीहि त्यांनीं आपल्या भाषणांत समजावून सांगितल्या. युद्धानंतरच्या काळांत मालाची हिंदी मागणी केवढी मोठी येऊं शकेल, ह्यास मर्यादाच नाहीं; खेडोपाडीं शिवण्याच्या मशीननें प्रवेश केला आहे ह्यावरून कोणत्या प्रकारचे प्रयत्न झाले पाहिजेत, ह्याची कल्पना करावी, असेंहि सर वॅटसन ह्यांनीं सांगितलें. युद्धापूर्वी हिंदुस्थानानें मोटारींची आयात केली तेवढी आयात शंभर वर्षांपूर्वी सर्व मालाची मिळूनहि होत नव्हती, हें दृश्य काय सांगतें ! हिंदी लोकांना ज्या पद्धतीनें सिगारेट ओढण्यास प्रवृत्त करण्यांत आलें, ती पद्धतच आणखी व्यापार कसा वाढविला पाहिजे, हें दाखवून देत आहे, असेंहि त्यांनीं सुचविलें. युद्धोत्तर काळांत ब्रिटिशांना हिंदुस्थानांत विशेष प्राधान्य मिळेल, असें गृहीत न धरतां हिंदी लोकांशीं सहनुभूतीनें वागूनच व त्यांच्या चालीरीतींस मान देऊनच आपले व्यवहार चालविले पाहिजेत, ही सर वॅटसन ह्यांची अखेरची सूचना आहे. हिंदुस्थान, चीन, वगैरे देशांतील शेतीविषयक प्रगतीकडे ब्रिटिश व्यापारी कोणत्या दृष्टीनें पहात आहेत व त्यांचे हितसंबंध तिच्याशीं कसे निगडित आहेत, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. खेडेगांवांतील लोकांजवळ पैसा निर्माण व्हावा, शेतीच्या मालाची किंमत वाढावी, मजुरीचे दर वाढावे, खेडोंपाडीं मालाचा प्रसार करावा, इत्यादि मार्गांनीं ब्रिटिश व्यापाराची वृद्धि व्हावी, अशी ही कल्पना आहे. शेतीसुधारणेमध्यें हिंदी जनतेचें हित निर्विवाद आहे, परंतु त्या सुधारलेल्या परिस्थितीमुळें निर्माण होणारी व्यापारी व औद्योगिक संधि हिंदी हितसंबंधांसच मिळावी व परदेशी व्यापाराची पकड पुरी बसण्यापूर्वी हिंदी कारखाने व व्यापार ह्यांची वाढ व्हावी, अशी योजना हिंदुस्थानांत झाली पाहिजे. हिंदी आर्थिक सुधारणेचे प्रश्न कसे गुंतागुंतीचे असतात व ते सोडवितांना कशा प्रकारची दक्षता बाळगणें आवश्यक होतें, हें समजण्यास सर आल्फ्रेड वॅटसन ह्यांचें भाषण मार्गदर्शक होईल.

### पूना मर्चंट्स को. बँक लि., पुणें
### ( वार्षिक सभा : ६-८-४४ )

कागदावरील सरकारी नियंत्रणामुळें ३० जून १९४४ अखेरचा वार्षिक वृत्तांत त्रोटक स्वरूपांत देण्याची बँकेस पाळी आली. वृत्तांताचे वर्षी बँकेच्या ठेवींत ४० हजार रुपयांची वाढ झाली. कर्जास मागणी कमी येऊन एकूण गुंतलेलें कर्ज २२ हजार रुपयांनीं घटलें. ८७ लवाद दाव्यांत गुंतलेली रक्कम ६२,६६७ रुपये आहे. बँकेच्या एकूण ७३ लक्ष रुपये खेळत्या भांडवलापैकीं ४ लक्ष ४१ हजार रुपये सरकारी कर्जरोख्यांत असून बँकेनें २ लक्ष, ३६ हजार रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. बँकेचे ३१ डिसेंबर १९४३ अखेरचे आयव्यय तपासून तिला " अ " वर्ग मिळालेला आहे. अहवालाचे वर्षांपासून गुढी पाडव्याचे दिवशीं पानसुपारी समारंभ करण्यास बँकेनें प्रारंभ केला तो उपक्रम सभासदांतील सहकार्य वाढविण्यास उपयुक्त होईल. वृत्तांताचे वर्षी बँकेस ७,६२१ रुपये नफा झाला त्यांतून भागीदारांस ४% डिव्हिडंड मिळणार आहे. अहवालाचे वर्षी श्री. वा. न. जोशी हे चेअरमन होते. श्री. भ. ग. सावणे, बी. कॉम. ह्यांची एजंट म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे.

# स्फुट विचार

## रिझर्व्ह बँकेच्या भागांची वाटणी

रिझर्व्ह बँकेचें भांडवल प्रारंभीं सर्वत्र हिंदुस्थानांत प्रमाणशीर वाटण्यांत आलें होतें, तरी पुढें बँकेचे भाग मुंबई विभागाकडे जमूं लागले व प्रत्येक भागीदाराजवळील भागांची सरासरी संख्या हळु-हळु वाढत जाऊं लागली. म्हणजे, थोड्या लोकांचे हातीं भाग एकत्रित होऊं लागले. २६ मार्च, १९४० नंतर कोणालाहि २०० पेक्षा अधिक भाग घेतां येऊं नयेत, अशी बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली. बँकेच्या स्थापनेचे वेळीं एकूण भागीदारांची संख्या ९२,०४७ होती ती ३० जून १९४३ अखेर ४९,४०२ झाली व ३० जून १९४४ अखेर ती ४८,२९२ वर आली. भागांची प्रांतवार वाटणी पहातां, मुंबई खेरीज बाकी सर्व विभागांतील भागांची संख्या कमी झाली असून मुंबईकडे भाग वळत आहेत. १९३५ सालीं एकूण ५ लक्ष भागांपैकी १,४०,००० भाग मुंबई विभागाच्या वाट्यास आले होते. ३०-६-४४ अखेर मुंबई विभागांत २,३१,१३३ भाग नोंदलेले आहेत. म्हणजे ३०-६-४३ ते ३०-६-४४ ह्या बारा महिन्यांत मुंबई विभागांतील भागांची संख्या ६,१११ नें वाढली आहे. ह्या मुदतींत कलकत्ता विभागांतील भागांची संख्या कायम राहिली, परंतु दिल्ली, मद्रास व रंगून ह्या विभागांतील भाग मुंबईकडे वर्ग झाले.

---

## शेड्यूल्ड बँकांची तपासणी

जून १९४४ अखेर संपलेल्या वर्षीं शेड्यूल्ड बँकांची संख्या ६४ वरून ७६ वर गेली. १३ बँकांस नव्यानें शेड्यूल्ड बँकांचा दर्जा प्राप्त झाला व एका शेड्यूल्ड बँकेचा व्यवहार दुसऱ्या शेड्यूल्ड बँकेकडे वर्ग झाला. दोन शेड्यूल्ड बँका रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूल मधून काढून टाकण्याच्या लायकीच्या आहेत, अशी शंका आल्यावरून रिझर्व्ह बँकेनें त्यांची तपासणी केली. त्यांपैकी एका बँकेचें खरें वसूल भांडवल व रिझर्व्ह ४२ ( ६ ) कलमांत सांगितलेल्या रकमेपेक्षा किंचित् अधिक आढळलें व ती बँक शेड्यूलमध्यें राहूं द्यावी, अशी रिझर्व्ह बँकेनें सरकारला शिफारस केली. दुसरी बँक शेड्यूलमध्यें रहाण्यास लायक नाहीं असें आढळून आलें व तिला आपली परिस्थिति सुधारण्यासाठीं सहा महिन्यांचा अवधि देण्यांत आला. ह्या बँकेची पुनः तपासणी अर्थात् होईलच. आणखी दोन शेड्यूल्ड बँकांना तपासणीसाठी तयार रहाण्याची सूचना देण्यांत आली आहे. ह्यावरून, एकादी बँक आज केवळ शेड्यूल्ड बँक आहे किंवा नाहीं एवढ्यावरूनच तिच्यासंबंधीं कांहीं अनुमान काढणें कसें योग्य नाहीं, हें दिसून येईल.

## शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी व त्यांनीं दिलेलीं कर्जें

१९४३-४४ मध्यें शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची संख्या १,६०७ ची २,१४१ झाली. म्हणजे ३० जून, १९४४ अखेरच्या बारा महिन्यांत ह्या बँकांच्या कचेऱ्यांत ५३४ ची भर पडली. त्यापूर्वीच्या वर्षीं २०२ नव्या शाखा स्थापन झाल्या होत्या. १३ बँका रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूलमध्यें नव्यानें दाखल झाल्या, त्यांच्या १५५ कचेऱ्या वगळल्या, तरी पूर्वीच्या शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ३७९ कचेऱ्यांची भर पडली असल्याचें दिसून येतें. ज्या ठिकाणीं शेड्यूल्ड बँक अथवा ५० हजार रुपयांवर वसूल भांडवल व रिझर्व्ह असलेली एकहि बँक नाहीं, अशा ८८ केंद्रांत नव्यानेंच ह्या कचेऱ्या आल्या. सर्व शेड्यूल्ड बँकांकडे मिळून ३० जून १९४४ अखेर ७४७¾ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या, म्हणजे बारा महिन्यांत ठेवींमध्यें सुमारें २०० कोटि रुपयांची वाढ झाली. त्याचा परिणाम शेड्यूल्ड बँकांचे पैसे रिझर्व्ह बँकेकडे वाढत्या प्रमाणांत रहाण्यांत झाला. कायद्यानें जेवढी रकम त्यांनीं रिझर्व्ह बँकेकडे ठेवणें आवश्यक आहे, त्यापेक्षा ३६¾ कोटि ज्यास्त रुपये त्यांनीं गेल्या वर्षीं ठेवले होते; ३० जून, १९४४ अखेर हीच रकम ४५¼ कोटि रुपये झाली. शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाचा आकडा ३०-६-४३ अखेर १४१½ कोटि रुपये होता, तो ३०-६-४४ अखेर २११¾ कोटि रुपये झाला. शेड्यूल्ड बँकांप्रमाणें बिगर शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींतहि वाढ झालेली आढळते. १९४२ अखेर त्यांचेकडे २४ कोटि, ६४ लक्ष रुपयांच्या ठेवी होत्या; १९४३ अखेर त्यांची रकम ३४ कोटि, ७९ लक्ष रुपये झाली.

---

## सहकारविषयक प्रश्नांची चर्चा

सहकारी प्रांतिक बँका आणि इन्स्टिट्यूट्स ह्यांच्या स्थायी समित्यांची सभा गेल्या शनिवारीं आणि रविवारीं मुंबई येथें भरली होती आणि तीमध्यें हिंदी सहकारी चळवळीसंबंधांत उत्पन्न झालेल्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा झाली. ह्या सभेमागून मुंबईत सहकारी रजिस्ट्रार्सची परिषद् भरली होती आणि तिच्या पुढेंहि चर्चेसाठी ह्याच प्रकारचे अनेक विषय होते. सदरहु परिषद् रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या विद्यमानें भरवण्यांत आली असून तीमध्यें सहकारी रजिस्ट्रार्स आणि प्रमुख सहकारी कार्यकर्ते उपस्थित होते, ह्या कारणानें तिच्या निर्णयास विशेष महत्त्व प्राप्त होणें स्वाभाविकच आहे. युद्धपरिस्थितीचे सहकारी संघटनावर झालेले परिणाम आणि युद्धोत्तर काळांत त्याचें व्हावयाचें संवर्धन ह्या दोन मुख्य बाबींशीं संलग्न असलेल्या प्रश्नांची चर्चा ह्या परिषदेंत झाली. तिचे निर्णय दूरगामी महत्त्वाचे झाल्यावांचून रहाणार नाहींत.

Telephone 779




TELEGRAM Guest House Poona 2.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. ढोणकर, एम्. ए., बी. कॉम् )

कलकत्याला चालूं असलेली सट्टेबाजी वजा करता बहुतेक बाजारांतील शेअर्स ज्यां चर्चिल म्हणतो त्याप्रमाणें आपल्या अपेक्षापेक्षां ल्डाई लवकर थांबली तर बेतानें असावें या हिशेबानें सगळीकडेच शांत आहेत. युद्धोत्तर येणाऱ्या परदेशी मालाच्या चढाओढीच्या सावल्या आतांच दिसूं लागल्या आहेत व या युद्धाच्या पावसाळ्यांत उगवलेल्या कांहीं कावळ्याच्या छत्र्या नकीच सुकून जाणार असें धरून चालायला हरकत नाहीं. टाटा स्टीलच्या पोटांत व्याज आहे व तें पुढें कायम राहणारें असल्यानें टाटा डिफर्ड शुक्रवारीं २२३० व ऑर्डिनरी ४२३ च्या आसपास चांगले टिकलेले आहेत. गिरण्या मात्र अधर दिशेकडे तोंड करून आहेत. डाईंग १८६२, कोहिनूर ६२३, नागपूर, ४१८, गोकाक ३१९, व इंदूर ८०२ असे भाव नरम आहेत. इंदूरमध्यें एखादी उफाळी येण्याचा दाट संभव आहे असें वाटतें. तद्वतच मोरारजी (९४७) मध्येंही चलबिचल दिसावी.

ज्यांना: लढाईच्या बंद होण्यामुळें येणाऱ्या उलटापालटींत फारसें अडकूं नये असें हवें आहे त्यांनीं असोसिएटेड सिमेंट (२३१; व्या. रु. ७ वार्षिक), बेलापूर साखर (२४६; व्या रु. ९), न्यू इंडिया विमा ( ८०; व्या. रु. २ ), टाटा ऑर्डिनरी ( ४२३; व्या. रु. २३ ), मदुरा मिल्स ( ६९; व्या. रु. ३-८ ), स्टील कॉर्पोरेशन प्रेफरन्स ( ११६; व्या. ५ रु. ) व सेंट्रल बँक ( रु. ८०; व्या. ३ रु. ) यांत रकमा गुंतविल्या तर अपेक्षा फारशी चुकणार नाहीं.

### बि. हिंदुस्थानाबाहेरील भागीदारांस नोटीस

ब्रिटिश हिंदुस्थानांत रजिस्टर झालेल्या कंपन्यांना आपल्या ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेरील भागीदारांवर नोटीस बजावण्याचें काम पुष्कळ प्रसंगीं अवघड व गैरसोईचें असतें. डिफेन्स ऑफ इंडिया नियम नं. ८१ एच द्वारें त्यासंबंधांतील कंपनी कायद्यांत सुधारणा घडवून आणली आहे. ज्यांनीं आपले पत्ते दिलेले नाहींत अशा, बि. हिंदुस्थानाबाहेरील भागीदारांसाठी वर्तमानपत्रांतून नोटीस प्रसिद्ध केली जाते, तिचे ऐवजीं कंपनीच्या नोंदलेल्या कचेरींत नोटीस प्रामुख्यानें दिसेल अशी लावली, तरी ह्यापुढें हरकत नाहीं असा नव्या नियमाचा आशय आहे. ज्या दिवशीं नोटीस लावली जाईल, त्याच दिवशीं ती दिली गेली, असें समजण्यांत येणार आहे.

### वालचंदनगर इंडस्ट्रीज लि.

३१ मार्च १९४४ असेरच्या वर्षी वरील कंपनीस २२३/४ लक्ष रुपये निव्वळ नफा झाला प्रेफरन्स भागीदारांस १२% ( वजा कर ) व ऑर्डिनरी भागीदारांस ३९% ( वजा कर ) डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीचें भांडवल १३१/२ लक्ष रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ५०१/२ लक्ष रुपयांचे आहेत. ३० लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स आहेत. प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कं. लि. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

## पुणें शहर

मांडवल :

( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर



# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत मांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें मांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी**: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा**: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा**: अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे (मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स**: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स**: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर १/२% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

## ब्रिटिश विमाव्यवसायाची राष्ट्रीय कामगिरी

### "तहाच्या अटी ठरवितांना विमाव्यवसायास विसरूं नका"

**(लॉइडसचे माजी चेअरमन, मि. डिक्सबी ह्यांचें भाषण)**

ग्रेटब्रिटनच्या अप्रत्यक्ष निर्गतींत विमा, बँकिंग व आगबोट वहातुक ह्यांच्या व्यवसायाचा मुख्यत: समावेश होतो. ब्रिटिश निर्गतीची किंमत १९३८ सालीं ५३½ कोटि पौंड भरली, परंतु त्यांत विम्याचे हप्ते व आगबोटींच्या वहातुकीचा खर्च हीं धरलेलीं नाहींत. ह्या मालापैकीं बहुतेक मालाची वहातुक ब्रिटिश आगबोटींतूनच झाली व जवळ जवळ सर्वच मालाचा विमा ब्रिटिश कंपन्यांनींच उतरला. वहातुकीचा खर्च व विम्याचे हप्ते ह्यांची भरपाई परदेशांतील गिऱ्हाइकांनीं केली, हें उघड आहे. त्यांनीं दिलेल्या हप्त्यांतून क्लेम्स वजा करून राहिलेली रकम ही अप्रत्यक्ष ब्रिटिश निर्गतच समजली पाहिजे. तिला अप्रत्यक्ष म्हणण्याचें कारण, सरकारी आकड्यांत तिचें निदर्शन होत नाहीं, परंतु देण्याघेण्याच्या व्यवहारांत त्या रकमेनें ग्रेट ब्रिटनचें येणें वाढतें. ग्रेट ब्रिटननें १९३८ सालीं ९२ कोटि पौंड रकमेच्या मालाची आयात केली. त्या रकमेंत वाहतुकीचा खर्च व विमा ह्यांचा समावेश झाला असला तरी, वरील मुद्दे त्यासहि लागू पडतात व परराष्ट्रीय देण्याघेण्यांत ग्रेट ब्रिटनला त्या प्रमाणांत अनुकूल येणें निघतें. जगांतील बहुसंख्य व्यवहारांचा विमा ग्रेट ब्रिटनमधील विमा संस्थांतच उतरला जातो. म्हणजे, जागतिक व्यापारावर ग्रेटब्रिटननें एकाप्रकारची पट्टीच बसविली आहे, असें म्हणाना. सर्व देशांनीं संरक्षक धोरणाचा अवलंब केला, तरी त्यांच्या आगबोटींचा विमा ब्रिटिश कंपन्यांकडेच यावयाचा अशी परिस्थिति आहे. आग, वादळ, धरणीकंप, घरफोडी, थर्डपार्टी रिस्क, वगैरे इतर विमे ग्रेटब्रिटनकडे पैसे खेचून आणीत असतातच. एकट्या विमा व्यवसायाकडून ब्रिटिश परराष्ट्रीय येण्याघेण्याच्या हिशेबांतील तफावतींत दरसाल किमान २ कोटि पौंडांची भर घातली जाते. कोट्यवधि रुपयांच्या हप्त्यांचें येणें व क्लेम्सचें व इतर देणें ह्यांमुळें ब्रिटिश बँकांना काम मिळतें हा आणखी एक अप्रत्यक्ष फायदा निर्माण होतो. ब्रिटिशांची पत वाढविण्यास ह्या सर्व गोष्टींचा उपयोग होतो व त्याची किंमत पैशानें मोजतां येणार नाहीं. विमा व्यवसायाच्या कामगिरीची निर्गत होऊन परराष्ट्रांत ग्रेटब्रिटनचें येणें निर्माण होतें, परंतु ह्या व्यवहारासाठी विमा कंपन्यांना कच्चा मालाची आयात करावी लागत नाहीं व उत्पादनाच्या खर्चांत वाढ झाल्यामुळें त्यांचा धंदा बसण्याची भीति नाहीं. ब्रिटिश कंपन्यांना परदेशांत जाचक वाटणाऱ्या गोष्टी दूर करण्याचा ब्रिटिश सरकारनें प्रयत्न करावा. तहाच्या अटी ठरवितांना विमा व्यवसायास विसरतां कामा नये. शत्रूच्या देशांतच केवळ नव्हे, तर जे देश ग्रेट ब्रिटन शत्रूच्या तावडींतून मुक्त करील, त्या देशांतहि ब्रिटिश विमा व्यवसायांस मोकळें क्षेत्र मिळालें पाहिजे, अशी व्यवस्था करणें आवश्यक आहे.

---

### उद्घाटन

मागोरा केमिकल कंपनी लि. च्या "बॅडिड लॅबोरेटरींचें" उद्घाटन रविवार तारीख ३० रोजीं सायंकाळीं ६ वाजतां रा. सा. एम. एस. नवलकर यांचे हस्तें झालें.

## जर्मनीमधील चित्रपटांचा धंदा

चालू महायुद्धापूर्वी युरोपांत दाखविण्यांत येत असलेल्या चित्रपटांपैकी सुमारे निम्मे चित्रपट अमेरिकन असत. प्रत्यक्ष जर्मनींत १९३८ सालीं दाखविलेल्या एकूण ५ हजार फुटांवरील दीर्घ चित्रपटांपैकी २१·७% अमेरिकन होते. १९३८ ते १९४३ ह्या मुदतीमध्यें युरोपांतील चित्रपटांचें उत्पादन ३४% घटलें आहे. जर्मनीचें चित्रपटांचें उत्पादन प्रारंभीं थोडें घटलें, तरी पुढें तें सालिना १०० ते ११० फिल्म्स इतकें कायम राहिलें आहे. १९३८ सालीं युरोपांत जेवढे चित्रपट तयार झाले, त्यांपैकी १६·५% चित्रपट जर्मनींत तयार झाले. १९४३ मधील उत्पादनांत जर्मनीचा वाटा २६% होता. जर्मनीचे खालोखाल इटलीचा अनुक्रम येतो व नंतर फ्रान्सचा अनुक्रम लागतो.

जर्मनीमधील चित्रपट-निर्मितीचा व्यवसाय सरकारी नियंत्रणाखालीच आहे; सिनेमागृहें मात्र खासगी मालकीचीं आहेत. चित्रपटांचे हक्क विकत घेऊन ते सिनेमागृहांस विकणारी मात्र एकच कंपनी आहे. एका मालकाचे हातीं चारापेक्षा अधिक सिनेमागृहें येऊं देत नाहींत. सिनेमागृहांत जमणाऱ्या गल्ल्यापैकी ३३% ते ३८% रकम डिस्ट्रिब्यूटर्सना द्यावी लागते. त्यांत नुकतीच ३% ची वाढ करण्यांत आली आहे. तिचा विनियोग एक फंड निर्माण करण्याकडे केलेला आहे. बॉम्बवर्षावांत नाश पावणारीं सिनेमागृहें पुन: बांधून काढण्याकडे त्या फंडाचा विनियोग व्हावयाचा आहे.

जर्मन सिनेमागृहांतील कार्यक्रमांत सुमारें ६५०० फुटांची मुख्य फिल्म, २,००० फुटांचे न्यूज रील, व १,००० फुटांची शैक्षणिक फिल्म ह्यांचा समावेश होतो. युद्धापूर्वी प्रत्येक चित्रपटाच्या ७० ते ८० प्रती काढीत असत, आतां २५० ते ३०० प्रती काढतात. न्यूज रीलच्या प्रतींची संख्याहि ८०० वरून १,२५० वर गेली आहे. ह्याखेरीज, इतर देशांत पाठविण्यासाठी ३५ भाषांत आणखी प्रती तयार केल्या जातात. जर्मनव्याप्त युरोपांत १९३८ ते १९४२ ह्या मुदतींत सिनेमाच्या तिकिटांचा खप खालीलप्रमाणें झाला:—

| | तिकिटांची संख्या | | तिकिटांची संख्या |
|---|---|---|---|
| १९३९ | ६२ कोटि | १९४१ | ८३ कोटि |
| १९४० | ८३ कोटि | १९४२ | ११० कोटि |

सबंद युरोपांत २७,००० सिनेमागृहें असून त्यांत १ कोटि, १० लक्ष लोकांची बसण्याची सोय आहे. दक्षिण युरोपापेक्षा उत्तर युरोपांत सिनेमागृहांची दाटी ज्यास्त आहे. सबंद युरोपांतील फिल्म्सचें उत्पादन व वाटणी ह्यांची सूत्रबद्ध व्यवस्था इंटर नॅशनल फिल्म चेंबर करतें, त्यांत १७ देशांतील चित्रपट धंद्याचा समावेश होतो. अर्थात्, त्या सर्वांमध्यें जर्मनीचेंच वर्चस्व आहे. जर्मनीमध्यें फिल्म्सच्या धंद्याकरितां "फिल्म क्रेडिट बँक" नांवाची एक स्वतंत्र बँक आहे.

---

### युद्धोत्तर वैमानिक वाहतुकीच्या योजना तयार

पॅन-अमेरिकन एअरवेज ह्या कंपनीनें आपल्या युद्धोत्तर वैमानिक वहातुकीचें वेळापत्रक प्रसिद्ध केलें आहे, त्याप्रमाणें न्यूयॉर्क-पॅरिस रिटर्न तिकिटास ३८ पौंड पडतील. उतारूस पॅरिसमध्यें २ दिवस राहातां येईल. न्यूयॉर्क-बर्लिन प्रवासास ३० पौंड व न्यूयॉर्क-टोकियो प्रवासास ५२ पौंड पडतील.

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यावर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळे दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे

( सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले )

## टोमॅटो केचप ( गोड ) व

## टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**

बिझिनेस ऑफिसः ९१३ अ सदाशिव, पुणें २.

तुमच्या आवडींत व ऐपतींत प्रसिद्धीचें प्रभावी साधन

## कॅलेंडर्स

## ( १९४५ )

नवीन आकर्षक चित्रांचा आल्बम तयार होत आहे.—

प्रमुख ठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

**दि आर्ट कॅलेंडर्स लि.**

१५ बुधवार पेठ, पुणें २

पुण्यांतील

## आदर्श निवासस्थान व भोजनालय

## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

## मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

**JUST PUBLISHED**

## INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

( Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay ).

Price Rs. 8

( Postage extra ).

*Sole Selling Agents :—*

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

## प्रगतीचें श्रेय आपणांकडे

**सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आलेलें काम | रु. २१, ४४, ४७१ | १९४२ | ५ लक्ष | ३ हजारानें |
| मंजूर काम | रु. १८, ३५, ७१४ | पेक्षां | १ लक्ष | १० हजारानें |
| पूर्ण विमा काम | रु. १६, १९, ७७५ | वाढ | ४ लक्ष | ७ हजारानें |

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा–योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक | मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.